आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक  बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

१ डिसेंबर २०२४ - रविवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- भुवनेश्वर इथं पोलीस महासंचालक आणि पोलीस महानिरीक्षक परिषदेचा प्रधानमंत्र्यांच्या उपस्थितीत समारोप

- राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या विधानसभा गटनेतेपदी जितेंद्र आव्हाड, तर मुख्य प्रतोदपदी रोहित पाटील यांची निवड

- रब्बी हंगामात ई-पीक पाहणी करण्याकरता सुधारित ई-पीक पाहणी मोबाईल ॲप शेतकऱ्यांसाठी उपलब्ध

- तेलंगणात पोलिसांसोबत झालेल्या चकमकीत सात नक्षलवादी ठार

**आणि**

- सैद मोदी आंतरराष्ट्रीय बॅडमिंटन स्पर्धेत एकेरीत पी व्ही सिंधु, तर दुहेरीत ट्रीसा जॉली आणि गायत्री गोपीचंद यांना विजेतेपद

**<><><><><>**

भुवनेश्वर इथे आयोजित अखिल भारतीय महासंचालक आणि पोलीस महानिरीक्षक परिषदेचा आज प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत समारोप झाला. तीन दिवस चाललेल्या या परिषदेच्या आजच्या शेवटच्या दिवशी प्रधानमंत्र्यांनी देशातल्या विविध राज्यं तसंच केंद्रशासित प्रदेशांच्या सुरक्षेशी संबंधित महत्त्वाच्या मुद्द्यांवर चर्चा केली. सायबर गुन्हे, किनारीपट्टी लगतची सुरक्षा, माओवादी बंडखोरी हे चर्चेचे विषय होते. भारताच्या विकासात अडथळा आणणाऱ्या बाबी, सीमेपलीकडून होणारा दहशतवाद आणि तस्करी, देशांतर्गत नक्षलवादाचं

आव्हान या मुद्यांवर यावेळी चर्चा  करण्यात आली. या परिषदेला केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, केंद्रीय गृहसचिव गोविंद मोहन, राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल देखील उपस्थित होते. यावेळी उपस्थित मान्यवरांनी पोलिसांसमोरची आव्हानं, पायाभूत सुविधांशी संबंधित प्रश्न या विषयांवर मार्गदर्शन केलं.

<><><><><>

निवडणुकीच्या धकाधकीमुळे तब्येत बरी नव्हती मात्र आता आपण ठीक असल्याचं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज वार्ताहरांना सांगितलं. गेल्या काही दिवसांपासून शिंदे त्यांच्या सातारा जिल्ह्यातल्या घरी गेले होते, तिथून मुंबईकडे परतताना त्यांनी आज वार्ताहरांशी संवाद साधला. मागच्या अडीच वर्षात आपण सुट्टी घेतली नव्हती, लोक सतत भेटायला येत होते, त्यामुळे आपली तब्येत बिघडल्याचं शिंदे यांनी सांगितलं. आपली कसलीही नाराजी नसून महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदाबाबत भाजपाचे ज्येष्ठ नेते जो निर्णय घेतील तो आपल्याला मान्य असेल याचा पुनरुच्चार त्यांनी यावेळी केला.

<><><><><>

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या विधानसभा गटनेतेपदी जितेंद्र आव्हाड यांची निवड करण्यात आली आहे. प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी आज मुंबईत पक्षाच्या नवनिर्वाचित आमदारांच्या बैठकीनंतर वार्ताहर परिषदेत ही घोषणा केली. तसंच पक्षाच्या मुख्य प्रतोदपदी रोहित पाटील, तर प्रतोदपदी उत्तम जानकर यांची निवड केल्याचंही त्यांनी जाहीर केलं. विधिमंडळ पक्षनेतेपदाचा निर्णय  झाला नसून येत्या काळात याबाबत पुन्हा बैठक घेणार असल्याचंही त्यांनी स्पष्ट केलं. विधिमंडळात राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या आमदारांची संख्या कमी असली, तरी राज्याच्या जनतेचे प्रश्न धडाडीनं आणि प्रभावीपणे मांडू, अशी ग्वाही त्यांनी दिली.

<><><><><>

राज्यात नुकत्याच पार पडलेल्या विधानसभा निवडणुकांमध्ये इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रांमध्ये फेरफार झाल्याचा दावा करणारी एक ध्वनीचित्रफित समाजमाध्यमांवर फिरत आहे. या ध्वनिचित्रफितीतल्या व्यक्तीविरोधात मुंबई पोलिसांच्या सायबर विभागानं गुन्हा दाखल केला आहे. याबाबत आपण तक्रार दाखल केली होती, अशी माहिती मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयानं समाजमाध्यमाद्वारे दिली.

इलेक्ट्रॉनिक मतदार यंत्र हे स्वतंत्र यंत्र असून, त्याला कोणत्याही कोणत्याही नेटवर्क, वाय - फाय किंवा ब्लूटूथला जोडता येत नाही, त्यामुळे या यंत्रासोबत छेडछाडीची कोणतीच शक्यता नाही, त्यामुळेच सर्वोच्च न्यायालयानंही अनेक वेळा या यंत्रांवर विश्वास व्यक्त केला असल्याचं निवडणूक कार्यालयानं म्हटलं आहे.

<><><><><>

सोलापूर जिल्ह्यात माळशिरसमधल्या मारकडवाडीतली मतदान प्रक्रिया निवडणूक आयोगाच्या सूचनेनुसार राबवली गेली असं सांगत निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी गावकऱ्यांची फेरमतदानाची मागणी फेटाळली आहे. मारकडवाडीतल्या ग्रामपंचायतीनं मतदान प्रक्रियेची खात्री करण्यासाठी पुन्हा एकदा फेरमतदानाच्या मागणीचा ठराव निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे पाठवला होता. मतदान यंत्र आणि व्हीव्हीपॅटवर होणारं मतदान योग्य आहे की नाही, याची मॉकपोलव्दारे चाचणी दोन्ही बाजूच्या उमेवारांच्या उपस्थितीत झाली. त्यावरचे आक्षेप तेव्हा नोंदवले नाहीत तेव्हा मतदानाची पुन्हा खात्री करण्यासाठी शासकीय यंत्रणा अथवा ईव्हीएम मशीन वापरता येणार नाही असं निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी म्हटलं आहे.

<><><><><>

जातीपातींना शास्त्रात स्थान नाही, तरीही जातीभेद सुरूच आहेत, अशी खंत राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांनी व्यक्त केली. ते आज नागपूर इथं एका कार्यक्रमात बोलत होते. आपली संस्कृती एका भाषेपुरती आणि जातीपुरती मर्यादित नाही, ती सर्वांची आहे, मात्र गेल्या दीडशे वर्षात संकुचित वृत्ती वाढत आहे, असं भागवत म्हणाले. फक्त आपल्यापुरतं पाहायची वृत्ती योग्य नाही, असंही त्यांनी यावेळीनमूद केलं.

<><><><><>

विधानसभा निवडणुकीत पक्षाला सर्व जागांवर समाधानकारक मतदान झालं असून आपल्या उणीवांवर मात करू असं मजलिस ए एत्तेहादुल मुसलमिन पक्षाचे अध्यक्ष खासदार असदुद्दीन ओवेसी यांनी म्हटलं आहे. ते छत्रपती संभाजीनगर इथं वार्ताहरांशी बोलत होते. आपण यापुढेही मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी वचनबद्ध असून त्यासाठी सातत्याने आवाज उठवत राहू, असं त्यांनी सांगितलं.

अजमेर शरीफ दर्ग्यामध्ये शिव मंदिर असल्याच्या दाव्यावर ओवेसी यांनी मत व्यक्त केलं. अजमेर शरीफ दर्गा हे धर्मनिरपेक्षतेचं प्रतिक असून पूजास्थळ कायद्याचं पालन होणं आवश्यक आहे, असं ओवेसी म्हणाले.

<><><><><>

राज्यात आजपासून सुरू होणाऱ्या रब्बी हंगामात शेतकऱ्यांना ई-पीक पाहणी करण्याकरता सुधारित ई-पीक पाहणी मोबाईल ॲप शासनाकडून उपलब्ध करून दिलं आहे. भविष्यात संपूर्ण राज्यात पीक पाहणी ही पूर्णपणे सुधारित ‘ई-पीक पाहणी DCS मोबाईल ॲप’द्वारे होणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी आपली पीक पाहणी या ॲपद्वारे ठराविक मुदतीत करून घ्यावी, जेणेकरून कोणत्याही शासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी अडचण येणार नाही, असं आवाहन जिल्हा प्रशासनानं केलं आहे. यापुढे पहिल्या दिवसापासून पीक पाहणी करण्यासाठी सहायकाची नेमणूक केली जात आहे. प्रत्येक गावासाठी सहायक उपलब्ध राहणार असून

सहायकामार्फत पीक नोंदणी होणार आहे. पीक विमा, पीक कर्ज, नैसर्गिक आपत्ती, एमएसपी अंतर्गत पिकांची नोंद इत्यादी सुविधांचा लाभ घेण्यासाठी ई-पीक पाहणी DCS मोबाईल ॲपमध्ये पिकांची नोंद असणं आवश्यक आहे.

<><><><><>

नागालँड आणि आसाम या दोन्ही राज्यांनी स्थापनेपासूनच शिक्षण, आरोग्य, रोजगार निर्मिती आणि पर्यटन क्षेत्रात उल्लेखनीय प्रगती केली आहे, असं प्रतिपादन राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी आज केलं. 'एक भारत, श्रेष्ठ भारत' या उपक्रमाचा भाग म्हणून राजभवन इथं नागालँड आणि आसाम या दोन्ही राज्यांचा स्थापना दिवस साजरा केला गेला, त्यावेळी ते बोलत होते. या दोन्ही राज्यांना निसर्गसंपन्नतेचं वरदान लाभलं आहे, असं सांगून या राज्यांना भेट देण्याचं आवाहन त्यांनी नागरिकांना केलं.

<><><><><>

तेलंगणात, मुलुगु जिल्ह्यात आज सकाळी पोलिसांसोबत झालेल्या चकमकीत किमान सात जहाल नक्षलवादी ठार झाले. या नक्षल्यांमध्ये राज्य समितीचा सचिव भद्रू उर्फ पपण्णा हा विजापूरचा असून इतर दोन राज्य समिती सदस्यांचा समावेश आहे. पोलिसांचे खबरे असल्याचं सांगून त्यांनी दोन आदिवासींना ठार मारल्यानंतर काही वेळातच ही चकमक झाली.

एटुरनगरम भागात नक्षलविरोधी कमांडो पथकाला आज सकाळी शोध मोहिमेदरम्यान नक्षलवाद्यांच्या हालचालींबाबत माहिती मिळाल्यानंतर हा गोळीबार झाल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. पोलिसांनी दोन एके-४७ रायफलही त्यांच्याकडून जप्त केल्या आहेत.

<><><><><>

ट्रीसा जॉली आणि गायत्री गोपीचंद या भारतीय जोडीनं सैद मोदी आंतरराष्ट्रीय बॅडमिंटन स्पर्धांमध्ये महिलांच्या दुहेरी सामन्याचं विजेतपद

पटकावलं. त्यांनी चीनच्या बाओ ली जिंग आणि ली क्वीन या जोडीचा २१-१८, २१-११ असा पराभव केला.

महिलांच्या एकेरी स्पर्धेचंही विजेतेपद भारताच्या पी. व्ही. सिंधूनं पटकावलं.

याआधी पुरुषांच्या दुहेरी स्पर्धेत पृथ्वी कृष्णमूर्ती रॉय आणि साई प्रतिक के. आणि तनिशा क्रेस्टो आणि ध्रुव कपिला यांच्या मिश्र दुहेरी जोडीला उपविजेतेपदावर समाधान मानावं लागलं.

हुआंग दी आणि लियु यांग या चिनी जोडीनं पृथ्वी आणि साई या जोडीचा १४-२१, २१-१९, १७-२१ असा पराभव केला, तर तनिशा आणि ध्रुव यांना थायलंडच्या देचापोल आणि सुपीसारा यांनी २१-१८, १४-२१, ८-२१ असा पराभव केला.

<><><><><>

कॉमनवेल्थ कराटे चॅम्पियनशिपमध्ये ५३ किलो गटात सोलापूरची आर्या साईनाथ यादवने रौप्यपदक पटकावलं आहे. दक्षिण आफ्रिकेत दर्बान इथं २६ नोव्हेंबरपासून ही स्पर्धा सुरु झाली. या स्पर्धेत ३९ देशांचा समावेश आहे. उद्या या स्पर्धेचा समारोप होईल.

<><><><><>

मुंबईला पाणी पुरवठा करणाऱ्या पिसे इथल्या धरणाच्या दरवाजांमध्ये बिघाड झाल्यामुळे तांत्रिक दुरुस्तीचं काम आज हाती घेतलं आहे. या तातडीच्या दुरुस्ती कामामुळे मुंबई शहर - उपनगर, ठाणे आणि भिवंडी भागाला  होणाऱ्या पाणी पुरवठ्यात १० टक्के कपात केली जाणार आहे. खबरदारीचा उपाय म्हणून उपरोक्त नमूद कालावधीत नागरिकांना पाणी काटकसरीने आणि जपून वापरायचं आवाहन बृहन्मुंबई महानगरपालिका प्रशासनानं केलं आहे.

<><><><><>

हिंगोली जिल्ह्याला इसापूर धरणातून रब्बी हंगामासाठी तीन पाणीपाळ्या तर उन्हाळी हंगामात चार पाणीपाळ्या देण्याच्या नियोजनास पाटबंधारे विभागानं मान्यता दिली. उर्ध्व पेनगंगा प्रकल्पांतर्गत इसापूर डावा कालवा व इसापूर उजवा कालवा आणि त्याअंतर्गत असलेल्या वितरण व्यवस्थेद्वारे प्रत्येक पाणीपाळीच्या कालवा संचलनाच्या प्रस्तावीत कार्यक्रमानुसार प्राप्त मागणीनुसार सिंचनासाठी पाणी सोडण्यात येईल, असं विभागानं कळवलं आहे.

<><><><><>

अहमदनगरच्या लष्करी केंद्रातून ३८६ अग्निवीरांचं प्रशिक्षण पूर्ण झालं असून आज त्यांचा दीक्षान्त समारंभ झाला. गार्ड्स रेजिमेंटल केंद्राचे कमांडट ब्रिगेडियर के. आनंद यांनी दीक्षान्त संचलनाला सलामी दिली.

<><><><><>

भारतीय लष्कर आणि कंबोडियाचे लष्कर  यांच्यात सीनबॅक्स या पहिल्या संयुक्त लष्करी टेबल टॉप सरावाला आज पुण्यात फॉरेन ट्रेनिंग नोड इथं प्रारंभ झाला.

<><><><><>

नांदेडमधल्या सिडको भागात लागलेल्या आगीत चारजण जखमी झाले. सिडको एमआयडीसीतल्या तिरुमला ऑईल इंडस्ट्रीजला दुपारी साधारण बाराच्या सुमारास लागलेली ही आग पोलिसांनी एका तासात आटोक्यात आणली.

<><><><><>

भंडारा जिल्ह्यात तुमसर तालुक्यातल्या माडणी इथं झालेल्या अपघातात एकजण मरण पावला तर एक जण गंभीर जखमी झाला आहे. ट्रकने दुचाकीला धडक दिल्याने हा अपघात झाला.

<><><><><>

राज्यात काल नाशिक इथं सर्वात कमी ११ पूर्णांक ५ अंश सेल्सिअस इतक्या तापमानाची नोंद झाली. येत्या दोन दिवसात कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात हवामान कोरडं राहण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे.

//<><><><><>//